स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 305.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दिनांक :

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**क्रीडा विभाग**

**मा.प्रभारी आयुक्तांनी केली मॅरेथॉन स्पर्धेच्या तयारीची पाहणी**

वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व्या राष्ट्रीय वसई विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या तयारीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या विविध कामांचा आढावा घेणेसाठी दि.०२ डिसेंबर २०२४ रोजी मा.प्रभारी आयुक्त श्री. रमेश मनाळे यांनी स्पर्धा मार्गावरील विविध ठिकाणी भेट देऊन स्पर्धेच्या तयारीची पाहणी केली.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धक धावपटूंना स्पर्धेदरम्यान कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये तसेच स्पर्धा सुरळीत पार पडावी यासाठी स्पर्धा मार्ग सुस्थितीत ठेवणे, रस्ता डागडुजी करणे, स्पर्धा मार्गावरील दिशादर्शक आखणे व इतर रंगरंगोटीची कामे, विद्युत व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक सुरक्षा आणि बॅरिकेडिंग इ. विविध कामे महानगरपालिकेमार्फत सध्या सुरु असून सदर कामांची पाहणी यावेळी मा. प्रभारी आयुक्त महोदयांनी केली व आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या.

क्रीडा विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका